CNR No.MHSI010003202024

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८/२०२४

(दत्तात्रय राळकर वै.२ – अर्जदार वि. देवेंद्र राधाकृष्ण वस्त वै.८– सामनेवाला)

## निशाणी २३ खालील आदेश

(१७.०३.२०२५)

...........

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी, सामनेवाला क्र.४– गितांजली गुरूनाथ तारी पूर्वाश्रमीची सुनंदा राधाकृष्ण वस्त हिचा मृत्यू दि. ०५.१२.२०२३ रोजी झाल्यामुळे, तिचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ५ महिने ७ दिवसांचा विलंब क्षमापित होणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे व सामनेवाला क्र.४–(अ) ते ४(क) यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत अर्जाकामी अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर दिवाणी किरकोळ अर्जातील सामनेवाला क्र.४ या दि.०५.१२.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. सामनेवाला क्र.४ हिचे वारस दि.०४.०३.२०२४ रोजीपर्यंतच्या मुदतीत अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतु सामनेवाला क्र.४ हिच्या मृत्यूची माहिती, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दि.२४.०६.२०२४ रोजी निशाण क्र.१५ येथे दाखल केलेल्या पुरशिस वरून अर्जदार यांना झालेने, सामनेवाला क्र.४ हिच्या वारसांबाबत मुदतीत तजवीज करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.४ हिचे वारस अभिलेखावर आणण्यास अर्जदाराला ५ महिने ७ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून झालेला नसून तो वर नमूद कारणामुळे झालेला आहे. त्यामुळे त्यांनी झालेला विलंब क्षमापित होवून मिळण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाकामी सामनेवाला क्र.४–(अ) ते ४(क) यांनी निशाण क्र.३६ येथे म्हणणे देवून, अर्जातील कारण संयुक्तिक नसून, अर्ज मंजूर करणे झाल्यास, अर्जदारावर खर्च बसविणेत यावा, असा आक्षेप नोंदविला आहे. प्रस्तुत अर्जाकामी हजर

झालेल्या उर्वरित सामनेवालेंनी सदर अर्जास म्हणणे दिलेले नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, अर्जदारांनी, यादी नि. २८ सोबत दाखल केलेल्या सामनेवाला क्र.४– गितांजली गुरूनाथ तारी पूर्वाश्रमीची सुनंदा राधाकृष्ण वस्त हिचा मृत्यू दि. ०५.१२.२०२३ रोजी झाल्याचे स्पष्ट होत आहे. प्रस्तुतच्या दिवाणी किरकोळ अर्जाचा लवकरात लवकर गुणदोषावर निर्णय होणे आवश्यक आहे व त्याकरीता न्यायहितार्थ अर्जदारांना संधी देणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही, उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन दिवाणी किरकोळ अर्ज गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. तथापि, अर्जदारांनी अर्जात नमूद केलेले विलंबाचे कारण, विलंबाचा कालावधी आणि सामनेवाला क्र.४–(अ) ते ४(क) यांनी प्रस्तुत अर्जास नोंदविलेला आक्षेप यांचा विचार करता, अर्जदारांवर खर्च रक्कम बसवून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य होणारे आहे. सबब, अर्जदारांनी मृतक सामनेवाला क्र.४ चे वारस सामनेवाला क्र.४–(अ) ते ४(क) यांना प्रत्येकी रू.२००/– एवढी खर्चाची रक्कम अदा करण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## –: <u>आदेश</u> :–

१. अर्ज (नि. २३) मंजूर करण्यात येत आहे.

२. उपशमन आदेश रद्दबातल करण्याकरीता दाखल अर्जास झालेला विलंब, अर्जदारांनी मृतक सामनेवाला क्र.४ चे वारस सामनेवाला क्र.४–(अ) ते ४(क) यांना प्रत्येकी रू. २००/– एवढी खर्चाची रक्कम सदर आदेशापासून १४ दिवसांच्या आत अदा करण्याच्या अटीवर क्षमापित करण्यात येत आहे.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2025.03.18 14:42:51 +0530

(हेमंत भ.गायकवाड)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

दिनांकः– १७.०३.२०२५